




दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ६०
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, रविवार, दि.१३ ऑक्टोबर २०२४


## अजित पवार महायुतीतून बाहेर पडणार? उद्धव ठाकरेंचा दावा?

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, मुंबई :** शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचा दसरा मेळावा मुंबईतील शिवतीर्थावर म्हणजेच दादर येथील शिवाजी पार्क मैदानावर पार पडला. या मेळाव्यात उद्धव ठाकरेंनी चौफेर टोलेबाजी करत भाजपा आणि एकनाथ शिंदेंना लक्ष्य केलं. तसंच अजित पवार महायुतीतून बाहेर पडणार असल्याचे संकेतही त्यांनी दिले. अजित पवार हे २०१९ ला जे महाविकास आघाडी सरकार आलं त्यातही उपमुख्यमंत्री होते आणि त्यानंतर महायुतीच्या सरकारमध्येही ते जुलै २०२३ पासून उपमुख्यमंत्री आहेत. मात्र लोकसभा निवडणुकीत जो काही पराभव महायुतीचा झाला त्यानंतर अजित पवार महायुतीतून बाहेर पडतील अशा चर्चा आहेत. दरम्यान उद्धव ठाकरेंनी त्यांचा उल्लेख करत अजित पवार बाहेर पडण्याचा दावा केला आहे.



**उद्धव ठाकरे भाषणात काय म्हणाले?**

उद्धव ठाकरे यांनी म्हटले की, महाराष्ट्राची ओळख सांगणारी ही लढाई आहे. महाराष्ट्राचं जे वर्णन आहे. मंगल देशा पवित्र देशा राकट देशा कोमल देशा, फुलांच्या देशा दळभद्र्यांच्या देशा नाही. बुद्धीच्या देशा. हे वर्णन कायम ठेवायचं आहे. लाचार आणि गद्दारांच्या देशा असं करायचं नाही. मी काही झालं तरी हा महाराष्ट्र भाजपच्या हाती जाऊ देणार नाही. फुले, आंबेडकर, शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र मोदी शाह यांच्या हाती जाऊ देणार नाही. असं उद्धव ठाकरे म्हणाले. त्याचप्रमाणे अजित पवार महायुतीत राहणार नाहीत या आशयाचं विधानही उद्धव ठाकरेंनी केलं.

**अजित पवारांबाबत काय म्हणाले उद्धव ठाकरे?**

उद्धव ठाकरे म्हणाले, आता असं कळलंय की ७० हजार कोटींचा घोटाळा करणारेही लाजून बाहेर पडणार आहेत. त्यांना पण लाज वाटू लागली आहे. असं ऐकलंय. यांचा घोटाळा मोठा आहे. माझा तर काहीच नाही असं त्यांना वाटतंय. असं मी ऐकलंय. अशी बातमी आहे. सगळं त्यांना लखलाभ असो जीवात जीव असे पर्यंत महाराष्ट्र लुटू देणार नाही. शेवटचा श्वास असेपर्यंत मी माझा महाराष्ट्र मोदी-शाह यांचा होऊ देणार नाही. शाहू, फुले आंबेडकरांचा आणि छत्रपतींचा महाराष्ट्र मोदींच्या हाती जाऊ देणार नाही अशीही गर्जना उद्धव ठाकरेंनी केली.

**आपल्यासमोरची लढाई म्हणजे महाभारत...**

आपल्यासमोर असलेली ही लढाई म्हणजे महाभारत आहे, पांडव पाच होते आणि कौरव शंभर. शकुनीमामा कोण तुम्हाला माहीत आहे. सुईच्या अग्रवार मावेल इतकीही जागा तुम्हाला देणार नाही अशी मस्ती कौरवांची होती. भाजपाचीही आज हीच भूमिका आहे. सुईच्या अग्रवार जमीन मावणार नाही पण ती अग्र तुमच्या कुठे टोचेल? आता तर तलवारी आहेत माझ्या समोर आहे. ज्यांनी तुम्हाला संकट काळात साथ दिली, महाराष्ट्रात यांना (भाजपा) कुणी विचारत नव्हतं तेव्हा आम्ही भाजपाला खांद्यावर घेतलं. आज आम्हाला भाजपाला खांदा द्यायचा आहे असा टोला उद्धव ठाकरेंनी लगावला.

## नळगंगा धरणाचे ३ दरवाजे उघडण्याने मलकापूर शहरातील काही वस्त्यात पाणी साचले

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, बुलडाणा :** बुलडाणा जिल्ह्यातील मोताळा तालुक्यातील नळगंगा धरण ओवरफ्लो झाले असून १०० टक्के भरले आहे. शुक्रवार, दिनांक ११ ऑक्टोबर रोजी रात्री साडेबारा वाजताच्या सुमारास धरणाचे ३ दरवाजे उघडण्यात आले. यामुळे नदीकाठच्या अनेक गांवासह मलकापूर शहरातील काही वस्त्यात पाणी साचले आहे. अनेक घरांत पुराचे पाणी शिरल्याने मोठे नुकसान झाले आहे. दाताळा गावात अक्षरशः हाहाकार उडाल्याचे चित्र आज शनिवार, दिनांक १२ ऑक्टोबर रोजी दिसून आले.

सततच्या पावसाने धरणातील जलसाठा वेगाने वाढला शुक्रवार, दिनांक ११ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री नंतर धरण शंभर टक्के भरलं आहे. धरण ओवरफ्लो झाल्याने मध्यरात्रीच धरणाचे ३ दरवाजे उघडण्यात आले आहे. दरवाजा क्रमांक एक, ११ आणि ६ हे दोन इंचाने उघडण्यात आले. पूर नियंत्रण कक्षाच्या वरिष्ठ सूत्रांनी ही माहिती दिली. यातून ४१९ क्यूसेकं इतका विसर्ग सोडण्यात येत आहे.

यामुळे नदीकाठच्या गावांना धोका झाला. गावकऱ्यांना सतर्क करण्यात आले . दरम्यान पुरामुळे मलकापूर येथील नळगंगा नदी पात्र नजीक असलेल्या वस्त्या जलमय झाल्या आहे.प्रामुख्याने रोहिदास नगर, सुभाषचंद्र बोस नगर, पारपेठ या सखल भागातील



वस्त्यातील अनेक घरात पुराचे पाणी शिरले. यामुळे गोर गरिबांच्या गृहोपयोगी साहित्य, धान्य, कपडे आदींची नासाडी झाली आहे.

दरम्यान मलकापूर आमदार राजेश एकडे, माजी आमदार चैनसुख संचेती, काँगेस, भाजप पदाधिकारी यांनी शनिवार, दिनांक १२ ऑक्टोबर रोजी सकाळी दाताळा गावाला भेट दिली. ग्रामस्थांशी संवाद साधून दिलासा दिला. यंत्रणा कडून नुकसाणीची माहिती घेत तातडीने मदत करण्याच्या सूचना दिल्या आहे. अनेक गावक्त्यांनी प्रशासनावर रोष व्यक्त केला.जनतेचा संताप लक्षात घेता पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

जलद कृती पथक ही घटनास्थळी दाखल झाले. पूर सदृश्य परिस्थितीने अनेकांचे घर उध्वस्त झाले असून परिवार, पशु यांना मिळेल तिथे आसरा घेतला. दुसरीकडे मोताळा तालुक्यातील अनेक गावांत शुक्रवारी रात्री कोसळधार पाऊस झाला. यामुळे शेतात पाणीच पाणी झाले आहे. काँग्रेसच्या जयश्री शेळके यांनी स्थानिय पदाधिकाऱ्या सह पाहणी करून शेतकऱ्यांना दिलासा दिला.तसेच मोताळा तहसीलदार यांच्याशी संवाद साधून पंचनामे आणि मदत करण्याची मागणी केली.

मलकापूर तालुक्यातील दाताळा येथील दीडशे घरात पाणीच जमा झाल्याचे भीषण चित्र आहे. यामध्ये नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नळगंगा धरणातून रात्रीपासून विसर्ग सुरू झाला. दाताळा सह काही गावातील नागरिकांना आपल्या याची माहितीच नसल्याने शेकडो परिवाराना आप आपल्या घरातील सामान काढण्यासही वेळ मिळाला नाही. इतकेच काय तर अनेक जण झोपेत असतानाच घरात पाणी शिरल्याने त्यांची रात्रीच्या अंधारातच तारांबळ उडाली नागरिकांनी एकमेकांना सतर्क करून बाहेर निघण्यास सांगितले .यामुळे सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही.

**खडकपूर्णा धरण 'ओवरफ्लो'!**
**७ दारे उघडली**

मागील काही दिवसांपासूनजालनाजिल्ह्यात पडणाऱ्या संततधार पावसाने देऊळगाव मही (ता. देऊळगाव राजा, जि.बुलडाणा) नजिकचे खडकपूर्णा धरण ओवरफ्लो झाले आहे. यामुळे धरणाचे ७ वक्राकार दरवाजे उघडण्यात आले असून नदीकाठच्या सर्व गावांना धोका निर्माण झाल्याने सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

## होती दाढी म्हणून उद्ध्वस्त केली, एकनाथ शिंदेंची आठवले स्टाइल कविता

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, मुंबई :** एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने यंदा दक्षिण मुंबईतील आझाद मैदानावर दसरा मेळाव्याचं आयोजन केलं आहे. या मेळाव्यातून मुख्यमंत्र्यांनी महाविकास आघाडीवर जोरदार हल्लाबोल केला. मुख्यमंत्री म्हणाले, माझी दाढी या लोकांना खुपते.

सारखं माझ्या दाढीवरून बोलतात. परंतु, एक गोष्ट मी सगळ्यांना सांगू इच्छितो, होती दाढी म्हणून उद्ध्वस्त केली तुमची महाविकास आघाडी, महाविरोधी आघाडी, महाराष्ट्राच्या विकासाची जोरदार धावू लागली गाडी, ही माझ्या दाढीची करामत आहे, म्हणून सांगतो मला हलक्यात घेऊ नका.




मुख्यमंत्री म्हणाले, आपल्या कार्यकाळात आपण मुंबई व महाराष्ट्रातील अनेक रखडलेले प्रकरण प्रकल्प पूर्ण केले. या लोकांनी (महाविकास आघाडी) मुंबईच्या विकासात पैसे खाल्ले.

मात्र, आपण आता मुंबईचा विकास करणार आहोत. आता मुंबईच्या रस्त्यांवर खड्डे दिसणार नाहीत. कारण हा एकनाथ शिंदे मुंबईचे रस्ते खड्डेमुक्त केल्याशिवाय राहणार नाही. जिथे टेंडर तिकडे सरेंडर अशी महाविकास आघाडीची भूमिका होती. कंत्राटदाराला सूट देताना महाराष्ट्राची लूट कशी करायची हे त्यांना माहीत होतं. हे सगळं करत असताना त्यांना जनाची नाही तर मनाची सुद्धा लाज वाटली नाही. मुख्यमंत्र्यांची उद्धव ठाकरेंवर टीका

एकनाथ शिंदे म्हणाले, उद्धव ठाकरे यांच्याकडे २५ वर्षे मुंबईचे सत्ता होती. परंतु, त्यांनी मुंबईत काहीच काम केलं नाही. धारावी प्रकल्पात काड्या घालण्याचं काम केलं. धारावीच्या विकासप्रकल्पासाठी नेमलेला पहिला कंत्राटदार या लोकांनी रद्द केला.

यांनी (उद्धव ठाकरे) स्वतः मात्र बंगल्यावर बंगले बांधले. परंतु, धारावीकरांना त्याच चिखलत ठेवलं. त्यानंतर ठराविक लोकांनाच घर देण्याचा देण्याची योजना त्या लोकांनी आखली.

मात्र, हा एकनाथ शिंदे म्हणाला, सगळ्यांना घरं द्या. एका घराची किंमत एक कोटी रुपये इतकी आहे. धारावीत दोन लाख घरं आहेत. दोन लाख कुटुंबांना दोन लाख घरं दिली जातील. याचाच अर्थ दोन लाख घरांसाठी दोन लाख कोटी रुपये मोजले जाणार आहेत. आम्ही गिरणी कामगारांना देखील घरं देणार आहोत. आम्ही मुंबई झोपडपट्टीमुक्त करणार आहोत.

## श्री महालक्ष्मी देवीला १६ किलो सोन्याची साडी परिधान

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.१२, पुणे :** दक्षिण भारतातील कारागिरांनी सुमारे २३ वर्षांपूर्वी साकारलेली सोन्याची साडी सारसबागेसमोरील श्री महालक्ष्मी देवीला यावर्षी देखील परिधान केली. मंदिर प्रशासनाच्या माध्यमातून दरवर्षी देवीच्या मूर्तीला ही तब्बल १६ किलो सोन्याची साडी परिधान केली जाते. विजयादशमीनिमित्त देवीला ही साडी परिधान करण्याची परंपरा आहे.

सुमारे ६ महिने ही साडी तयार करण्याचे काम सुरु होते. देवीला एका भक्ताने ही साडी अर्पण केली आहे. ही साडी तब्बल १६ किलो वजनाची आहे. आकर्षक नक्षीकाम करुन ही सोन्याची साडी साकारण्यात आली आहे. त्यामुळे श्री महालक्ष्मी देवीचे हे सुवर्णवस्त्रातील रुप पाहण्याकरीता भाविकांची दरवर्षी गर्दी होते. त्यानुसार यंदा देखील भाविक मोठ्या संख्येने देवीचे दर्शन घेण्यासाठी आले होते. श्री महालक्ष्मी मंदिर सारसबाग, श्री बन्सीलाल रामनाथ अग्रवाल धार्मिक व सांस्कृतिक ट्रस्टतर्फे वर्षातून दोनदा ही साडी नेसवली जाते. मंदिराचे संस्थापक विश्वस्त राजकुमार अग्रवाल, प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल, विश्वस्त ॲड. प्रताप परदेशी, डॉ. तृप्ती अग्रवाल, भरत अग्रवाल, प्रवीण चोरबेले, हेमंत अर्नाळकर, नारायण काबरा आदी यावेळी उपस्थित होते.

## अजित पवार गटाचे नेते बाबा सिद्दीकी यांच्यावर गोळीबार

**अक्षराज : वृत्तसंकलन**




**दि.१२, मुंबई :** अजित पवार गटाचे नेते बाबा सिद्दीकी यांच्यावर गोळीबार करण्यात आला आहे. झिशान सिद्दीकी यांच्या कार्यालयाबाहेर हा हल्ला झाल्याची माहिती आहे. हल्लेखोरांनी बाबा सिद्दीकी यांच्यावर दोन ते तीन राऊंड फायर केल्याचं सांगण्यात येत आहे. दरम्यान, बाबा सिद्दीकी यांना लिलावती रुग्णालया दाखल करण्यात आलं असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे.

## काँग्रेसच्या 'या' विद्यमान आमदाराचे सहा वर्षांसाठी पक्षातून निलंबन



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, अमरावती :** राज्यात विधानसभेची निवडणूक जवळ आली असून पुढील काही दिवसांत आचारसंहिता लागू होण्याची शक्यता आहे. त्यामुळे राज्याच्या राजकारणात अनेक घडामोडींना वेग आल्याचं पाहायला मिळत आहे. सध्या राज्यातील सर्वच पक्षांचे नेते जोरदार कामाला लागले आहेत. अनेक नेत्यांकडून मतदारसंघात मोर्चेबांधणी देखील सुरु आहे. तसेच विविध ठिकाणी सभा आणि मेळावे घेतले जात आहेत. यातच ऐन निवडणुकीच्या तोंडावर अनेक नेते, एका पक्षातून दुसऱ्या पक्षात प्रवेश करण्याच्या तयारीत असल्याचंही पाहायला मिळत आहे. यातच काँग्रेसच्या अमरावती विधानसभा मतदारसंघातील विद्यमान आमदार सुलभा खोडके या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात प्रवेश करणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. या चर्चांनंतर काँग्रेसने आमदार सुलभा खोडके यांच्यावर मोठी कारवाई केली आहे. आमदार सुलभा खोडके यांना काँग्रेस पक्षातून सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आलं आहे. काँग्रेस पक्षाचे राज्याचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या आदेशावरून काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आमदार सुलभा खोडके यांच्यावर निलंबनाची कारवाई केली आहे. यासंदर्भातील एक पत्रक प्रसिद्ध करण्यात आलं आहे. तसेच याबाबतचे वृत्त एएनआय या वृत्तसंस्थेने दिलं आहे. आमदार सुलभा खोडके यांच्यावर पक्षविरोधी कारवाया केल्याचा ठपका ठेवत ही कारवाई करण्यात आल्याची माहिती सांगितली जात आहे.

**सुलभा खोडके राष्ट्रवादीत प्रवेश करणार?**

गेल्या काही दिवसांपासून काँग्रेसच्या आमदार सुलभा खोडके या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात प्रवेश करणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. या चर्चांबाबत त्यांची कोणतीही प्रतिक्रिया समोर आलेली नव्हती. मात्र, पुढील काही दिवसांमध्ये सुलभा खोडके या राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांच्या पक्षात प्रवेश करणार असल्याचं बोललं जात आहे.

**निलंबनाची कारवाई का केली?**

आमदार सुलभा खोडके यांच्यावर पक्षविरोधी कारवाया केल्याचा ठपका ठेवत काँग्रेस पक्षाचे राज्याचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या आदेशावरून काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी निलंबनाची कारवाई केली असल्याची माहिती सांगण्यात येत आहे.

# संपादकीय



## चित्रपट सृष्टीतील अवलिया अष्टपैलू

हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया व्यक्तिमत्त्व असलेले किशोर कुमार यांचा आज स्मृतिदिन. आजच्याच दिवशी म्हणजे १३ ऑक्टोबर १९८७ रोजी किशोर कुमार यांचे निधन झाले. किशोर कुमार हे हिंदी चित्रपट सृष्टीला लाभलेले अनमोल रत्न आहे. चित्रपट निर्मितीतील असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात त्यांचा सहभाग नाही. पार्श्वगायक, संगीतकार, गीतकार, निर्माता, दिग्दर्शक, अभिनेता, पटकथा लेखक असे चित्रपट निर्मितीतील सर्वच प्रकारात त्यांनी मुक्त विहार केला. किशोर कुमार यांचे मूळ नाव आभास कुमार गांगुली असे होते. ४ ऑगस्ट १९२९ रोजी मध्यप्रदेशातील खांडवा येथे किशोर कुमार यांचा जन्म झाला. त्यांचे वडील कुंजलाल गांगुली हे वकील होते तर आई गौरादेवी या गृहिणी होत्या. त्यांचे थोरले बंधू अशोक कुमार आणि अनुप कुमार हे दोघेही हिंदी चित्रपट सृष्टीत नायक म्हणून कार्यरत होते. किशोर कुमार हे देखील आपल्या भावांप्रमाणे चित्रपट सृष्टीत नशीब आजमावण्यासाठी धडपडत होते. १९५० साली कुंजलाल गांगुली यांनी किशोर कुमार यांना मुक्कदर या चित्रपटात काम दिले. १९५२ ते १९६० या दरम्यान किशोर कुमार यांनी बऱ्याच चित्रपटात काम केले. नोकरी, अधिकार, धोबी डॉक्टर, ईलजाम, मिस माला, झलक हे चित्रपट त्यांनी १९५४ या एकाच वर्षात पूर्ण केले. १९५६ साली तर त्यांनी ९ चित्रपटात भूमिका केल्या. हा त्याकाळी एक विक्रम होता. त्यानंतर ते अभिनयासाठी गायनही करु लागले. अभिनय आणि गायन असा त्यांचा समांतर प्रवास सुरू झाला. किशोर कुमार यांनी आपल्या मिश्किल स्वभावाने चित्रपट सृष्टीत विनोदी भूमिकांचा नवा ट्रेंड आणला. अभिनय करताना गायन आणि संगीताचा तालावर थिरकने असा नवा ट्रेंड त्यांनी सुरू केला. किशोर कुमार यांच्या या नवीन स्टाईलने तरुणांना भुरळ घातली. त्याकाळातील सर्व दिग्गज नायिकांसोबत त्यांनी भूमिका केल्या. मधुबाला सोबत त्यांची जोडी विशेष जमली. अभिनयासोबत गायनातही ते यशस्वी होऊ लागले. त्यांची गाणी लोकप्रिय होऊ लागली. किशोर कुमार यांना संगीतकार सचिन देव बर्मन यांनी अनेक संधी दिल्या. सचिन देव बर्मन यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली त्यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली. पुढे सचिन देव बर्मन यांचे चिरंजीव राहुल देव बर्मन उर्फ पंचमदा यांच्याशी जोडी जमली या जोडीने अनेक लोकप्रिय गाणी चित्रपट सृष्टीला दिली. लता मंगेशकर आणि आशा भोसले यांच्यासोबत त्यांनी शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. किशोर कुमार यांनी तीन दशकांहून आधीक काळ गायन केले. देव आनंद यांच्यापासून अनिल कपूर यांच्यापर्यंत सर्वच नायकांना त्यांनी आवाज दिला. किशोर कुमार यांचा आवाज ज्या नायकासाठी वापरला गेला तो नायक स्टार बनला. राजेश खन्ना यांना बॉलिवूडचा सुपरस्टार बनवण्यामागे किशोर कुमार यांचाही मोठा हात आहे. राजेश खन्ना यांच्या सर्व चित्रपटांमध्ये किशोर यांचाच आवाज वापरला गेला. आराधना पासून जमलेल्या या जोडीने पुढे इतिहास घडवला. या जोडीची सर्व गाणी हिट झाली. ज्या ज्या वेळी राजेश खन्ना यांचे नाव निघते त्या त्या वेळी किशोर कुमार यांचेही नाव घेतले जाते. किशोर कुमार यांनी ४०० हुन अधिक चित्रपटात शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. नायक, गायक यासोबत ते दिग्दर्शकही होते. चलती का नाम गाडी यासारख्या विनोदी चित्रपटसोबतच दूर गगन की छाव मे यासारखा गंभीर चित्रपटही त्यांनी काढला. त्यांनी काही चित्रपटांना संगीतही दिले तर काही चित्रपटांसाठी गाणीही लिहिली. किशोर कुमार यांनी चित्रपटाच्या पटकथाही लिहील्या. असा हा हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया अष्टपैलू १३ ऑक्टोबर १९८७ रोजी जगाला अलविदा करून कायमचा निघून गेला. किशोर कुमार यांच्या जादुई आवाजाची मोहिनी आजही कायम आहे. आजही त्यांची गाणी पूर्वीइतकीच लोकप्रिय आहेत. किशोर कुमार यांनी चित्रपट सृष्टीवर असा ठसा उमटवला आहे की त्यांच्या नावाशिवाय हिंदी चित्रपट सृष्टीचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही.

किशोर कुमार यांना स्मृतिदिनी
विनम्र अभिवादन!

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि नैना हे महाराष्ट्राला पॉवर हाऊस बनविणारे प्रकल्प : मुख्यमंत्री

**दि.११, ठाणे :** सिडको महामंडळातर्फे साकारण्यात येत असलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि नैना शहर या प्रकल्पांमध्ये महाराष्ट्राला पॉवर हाऊस बनविण्याची क्षमता आहे, असे प्रशंसोद्गार मुख्यमंत्री श्री.एकनाथ शिंदे यांनी आज वाशी, नवी मुंबई येथे काढले.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प येथे भारतीय वायुदलातर्फे सी-२९५ एअरक्राफ्टची लँडिंग आणि सुखोई-३० एअरक्राफ्टची फ्लायपास्ट चाचणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुरलीधर मोहोळ, नागरी उड्डाण राज्यमंत्री, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत यशस्वीरीत्या पार पाडण्यात आली. त्यानंतर सिडको प्रदर्शन केंद्र, वाशी, नवी मुंबई येथे पार पडलेल्या समारंभात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सिडकोच्या २६ हजार ५०२ सदनिकांच्या महागृहनिर्माण योजनेचा प्रारंभ, महाराष्ट्र भवन, नैना नगर रचना परियोजना ८ ते १२ मधील पायाभूत सुविधा विकास कामे, ठाणे नागरी पुनरुत्थान योजना (नवीन ३ हजार ८३३ सदनिका), पश्चिम परिघीय (नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ) मार्ग यांचे भूमिपूजन; १८ होल्सच्या आंतरराष्ट्रीय खारघर व्हॅली गोल्फ कोर्स व सेंटर ऑफ एक्सलन्स येथील दर्शक गॅलरी यांचे उद्घाटन आणि ईर्शाळवाडी पुनर्वसन प्रकल्पाचे लोकार्पण करण्यात



आले, त्यावेळी ते बोलत होते.

या प्रसंगीसंजय शिरसाट, अध्यक्ष, सिडको, श्रीरंग बारणे, लोकसभा सदस्य, मावळ,नरेश म्हस्के, लोकसभा सदस्य, ठाणे, निरंजन डावखरे, विधानपरिषद सदस्य, ज्ञानेश्वर म्हात्रे, विधानपरिषद सदस्य, गणेश नाईक, विधानसभा सदस्य, ऐरोली, प्रशांत ठाकूर, विधानसभा सदस्य, पनवेल, मंदा म्हात्रे, विधानसभा सदस्य, बेलापूर, महेश बालदी, विधासभा सदस्य, उरण, विजय सिंघल, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको, शान्तनु गोयल, सहव्यवस्थापकीय संचालक सिडको, गणेश देशमुख, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, दिलीप ढोले, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको यांसह सिडकोतील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना मुख्यमंत्र्यांनी विमानांच्या यशस्वी लँडिंग व फ्लायपास्टकरिता सिडको व अन्य संबंधितांचे अभिनंदन केले. सिडकोच्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि नैना शहर प्रकल्पांद्वारे मुंबई महानगर प्रदेशाचा मोठ्या प्रमाणावर आर्थिक विकास घडवून आणण्याची व महाराष्ट्राला पॉवर हाऊस बनविण्याची क्षमता असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले. ईर्शाळवाडी दरडग्रस्तांकरिता कमी कालावधीत घरे बांधून सिडकोने मानवता जपली असल्याचा उल्लेखही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केला.

याप्रसंगी ईर्शाळवाडी पुनर्वसन प्रकल्पातील दुर्घटनाग्रस्तांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरूपात घरांच्या चाव्यांचे वाटप करण्यात आले. तसेच ईर्शाळवाडी दरडग्रस्तांपैकी सिडकोमध्ये कंत्राटी स्वरूपावर नियुक्ती देण्यात आलेल्या व्यक्तींना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरूपात नियुक्तीपत्रे देण्यात आली. तसेच सिडकोच्या विविध प्रकल्पांची माहिती देणाऱ्या कॉफी टेबल बुकचे प्रकाशनही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते याप्रसंगी करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना विजय सिंघल यांनी सिडकोच्या प्रकल्पांविषयी संक्षिप्त माहिती दिली.

# महापे येथे महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्पाचे उद्घाटन

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.११, महापे (नवी मुंबई) :** सर्वोत्तम तंत्रज्ञानाने सज्ज असा हा महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प (सायबर सिक्युरिटी प्रोजेक्ट) जनतेमधील सायबर अटॅकची भीती निश्चितच कमी करेल. हा प्रोजेक्ट जनतेचे डिजिटल माध्यमातून होणाऱ्या फसवणूकीचे प्रमाण कमी करण्यात, त्यांना दिलासा देण्यात नक्कीच यशस्वी होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज महापे येथे व्यक्त केला.




नवी मुंबईतील महापे औद्योगिक वसाहत येथील मिलेनियम बिझनेस पार्क या ठिकाणी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी आमदार रमेश पाटील, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) इकबाल चहल, अपर पोलीस महानिरीक्षक अर्चना त्यागी, विशेष पोलीस महानिरीक्षक (सायबर), यशस्वी यादव, पोलीस महानिरीक्षक (आर्थिक गुन्हे) बिपिन कुमार सिंह, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव ब्रिजेशसिंह, पोलीस उपमहानिरीक्षक, सायबर संजय शिंत्रे, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, औद्योगिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक पी. वेलरासू, उपमुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी कौस्तुभ धवसे, गृह विभागाचे सहसचिव राहुल कुलकर्णी, वास्तूरचनाकार सलोनी देवधर, सपना कोळी, सायबर सुरक्षा प्रकल्पाचे व्यवस्थापक नवनाथ देवगुडे आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सायबर सिक्युरिटी हा सर्वांचा ड्रीम प्रोजेक्ट असून महाराष्ट्रासाठी एक आयकॉनिक प्रोजेक्ट आहे. सर्व जगात डिजिटायजेशन झपाट्याने वाढत आहे. त्याचबरोबर या क्षेत्रातील आव्हानेही तितक्याच प्रमाणात वाढत आहेत. पूर्वी आर्थिक गुन्हे शाखेचे महत्त्व विशेष नव्हते, मात्र ते नंतर वाढू लागले तसेच आता सायबर विंगचेही महत्त्व वाढू लागले आहे. डिजिटल युगातील सायबर अटॅक चा सामना करण्यासाठी आपण सुसज्ज व्हावे, ही काळाची गरज होती. ती या सेंटरच्या माध्यमातून पूर्ण झाली आहे. हे सेंटर देशातील सर्वात आधुनिक सायबर सिक्युरिटी सेंटर झाले आहे.

व्हाट्सअप, फेसबुकच्या माध्यमातून खोट्या मेसेजच्या आधारे लोकांची फसवणूक होत होती, होत आहे. यावर शासनाने गांभीर्याने विचार करून अशा प्रकारचे आधुनिक सायबर सिक्युरिटी सेंटर सुरू केले आहे. या माध्यमातून दरवर्षी ५ हजार पोलिसांना प्रशिक्षण दिले जाऊ शकते. महाराष्ट्र हा भारतातील तंत्रज्ञान क्षेत्राचे नेतृत्व करीत आहे. हा केवळ प्रकल्प न राहता कॉर्पोरेशन व्हावे, इतर राज्यांनाही या माध्यमातून सायबर सिक्युरिटी बाबतचे मार्गदर्शन केले जावे, खाजगी क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान तज्ञांशीही आपला समन्वय वाढवावा, अशी अपेक्षा व्यक्त करून त्यांनी या माध्यमातून जनतेला सायबर सिक्युरिटी उत्तम प्रकारे देण्यात आपण यशस्वी होवू, असा विश्वास व्यक्त केला.

१४४०७ हा हेल्पलाईन नंबर आजपासून कार्यान्वित होणार असून दि. १५ ऑक्टोबर पासून या केंद्रातील सर्व सेवा पूर्ण क्षमतेने सुरू होणार आहेत. या कार्यक्रमाच्या निमित्ताने महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्पाच्या संकेत स्थळाचेही उद्घाटन उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी या सायबर सिक्युरिटी प्रकल्पामध्ये महत्त्वाचे योगदान दिल्याबद्दल मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव ब्रिजेशसिंह, विशेष पोलीस महानिरीक्षक (सायबर), यशस्वी यादव आणि कौस्तुभ धवसे व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे विशेष कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपमुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी कौस्तुभ धवसे यांनी केले.

## दसरा...

उजळती दशदिशा
जयघोष विजयाचा
वर्षावात शुभेच्छांच्या
हर्ष उल्हास भाग्याचा ।।१।।

अहंकार नष्ट करा
नको कोणा भाव दुजा
नवविद्या भक्तीरस
नवरात्री नऊ पूजा ।।२ ।।

काली माता अंबाबाई
नवदुर्गा अष्टभुजा
दुष्ट प्रवृत्ती सोडून
सत्संगाला नित्य भजा ।।३।।

शोभे झेंडूची तोरणे
शस्त्र अस्त्र पाटीपूजा
दारी रांगोळी नक्षीची
सरस्वती पाद्यपूजा।।४।।

आपट्याचे सोने लुटा
व्याभिचार नष्ट करा
नवढंग स्वीकारून
पथ मदतीचा धरा ।।५।।

सण विजया दशमी
आला सुवर्ण दसरा
जावो द्वेष अहंकार
नव उमंग पसरा ।।६।।

**सौ. शामला पंडित (दीक्षित)**

# एनएमएमटी मध्ये महिलांना ५० टक्के सवलत...

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१२, वाशी (नवी मुंबई) :** विकासाला गती देणारे चांगले काम नवी मुंबई मनपा च्या माध्यमातून होत असून आज २५ नागरी सुविधांचे व प्रकल्पांचे लोकार्पण आणि भूमिपूजन होत आहे याबद्दल समाधान व्यक्त करीत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यामध्ये ऑलिंपिक आकाराचा तरणतलाव, महिलांसाठी कॅन्सर तपासणी सुविधा, १० बेडचा केमोथेरपी वॉर्ड, शाळा, मार्केट, आरोग्य केंद्र, जलकुंभ, ई-बसेस, ई-चार्जिंग अशा ४१० कोटीहून अधिक रक्कमेच्या विविध प्रकारच्या सुविधांचा समावेश असल्याचे सांगितले. पाण्यावर पुनर्प्रक्रिया केली जाते, आता महानगरपालिका कापडावर पुनर्प्रक्रिया करणार आहे, अशा वेगळया प्रकारच्या आधुनिक प्रकल्पाचा लोकांना फायदा होईल असेही ते म्हणाले.

नमुंमपा आणि सिडको यांच्या वतीने वाशी येथील सिडको प्रदर्शनी केंद्रात विविध नागरी सुविधा, प्रकल्प यांचा लोकार्पण व भूमिपूजन समारंभ महाराष्ट्र राज्याचे



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. याप्रसंगी सिडकोचे अध्यक्ष संजय शिरसाट, खा.श्रीरंग बारणे, खा.नरेश म्हस्के, आ.गणेश नाईक, आ.निरंजन डावखरे, आ.मंदा म्हात्रे, सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकिय संचालक विजय सिंघल, नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे, केंद्रीय वस्त्र मंत्रालयाच्या वस्त्र समितीच्या आयुक्त तथा उपाध्यक्ष रुप राशी आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी मुख्यमंत्री महोदयांनी माझी लाडकी बहीण योजनेत नवी मुंबईतील १ लाख ४५ हजारहून अधिक महिलांना प्रत्यक्ष लाभ मिळाला असल्याचे सांगितले. तसेच संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम अंतर्गत परिसर सखी वस्ती संघामधील १० महिला वाहन चालकांना इलेक्ट्रिक वाहनाची चावी मुख्यमंत्री महोदयांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आली.

त्याचप्रमाणे नमुंमपा परिवहन उपक्रमाच्या एनएमएमटी बसेसमधून महिलांना तिकीट दरात ५०% म्हणजे हाफ तिकीटात प्रवास करता येईल अशी घोषणा मुख्यमंत्री महोदयांनी करताच कार्यक्रमास मोठया संख्येने उपस्थित महिलांनी टाळयांचा गजर केला.

पालिकेच्या अधिकारी, कर्मचारी यांना मागील वर्षी दिवाळीला ३० हजार सानुग्रह अनुदान मिळाले होते यावर्षी त्यामध्ये ३ हजाराची भरीव वाढ करीत ३३ हजार सानुग्रह अनुदान देण्यात येईल असेही मुख्यमंत्री महोदयांनी जाहीर केले.

याप्रसंगी बोलताना आ.गणेश नाईक व आ.मंदा म्हात्रे यांनी आपल्या मनोगतात नागरिकांकरिता महानगरपालिकेच्या वतीने सुरु असलेल्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले.

# रावण दहन योग्यच !

साडेतीन मुहूर्तांपैकी एक पूर्ण मुहूर्त असलेल्या विजयादशमी सणाचे हिंदू धर्मात विशेष महत्व आहे, याच दिवशी प्रभू श्री रामचंद्रांनी लंकापती रावणाचा वध करून एक नवा पायंडा जगासमोर ठेवला. प्रकांड पंडित असलेला रावण मोठा शिवभक्त होता.

त्यामुळे त्याला मानणारा समाज आजही श्रीलंकेत दिसून येतो; मात्र रावण हा स्त्रीलंपट होता आणि त्याने सीताहरणाच्या आधीही अनेक स्त्रियांना पळवून आणून त्यांचा उपभोग घेतला असल्याची अनेक उदाहरणे रामायणाचा अभ्यास केल्यावर आपल्या लक्षात येतील. एका अप्सरेचे अपहरण करून तिच्यावर अत्याचार केल्यावर रावणाला ब्रह्मदेवाकडून शाप मिळाला होता, की यापुढे त्याने कोणत्याही स्त्रीचा बळजोरीने उपभोग घेण्याचा प्रयत्न केला, तर त्याच्या मस्तकाची शेकडो शकले होतील. याशिवाय सीतेच्या पातिव्रत्यामुळे रावणाला सीतेला स्पर्श करणे नंतर कधीच शक्य झाले नाही.

रावणाची दुष्कर्मे जाणून घ्यायची असतील तर आधी रामायणाचा अभ्यास करायला हवा. विजयादशमी जवळ आली कि काही नास्तिक विचारसरणीची पुरोगामी मंडळी रावण हा दानशूर ब्राह्मण होता. त्याने केवळ आपल्या बहिणीच्या अपमानाचा सूड म्हणून सीतेचे हरण केले; मात्र सीतेचा शीलभंग करण्याचा त्याने कधीच प्रयत्न केला नाही त्यामुळे त्याचे दरवर्षी प्रतीकात्मक दहन करणे चुकीचे असल्याचे बरळू लागतात.

भारतीय संस्कृतीशी अथवा येथील पौराणिक संदर्भांशी काही देणेघेणे नसलेली ही मंडळी हिंदूंच्या सण उत्सवांमध्ये आडकाठी आणण्यासाठी लोकांचा बुद्धिभेद करण्याचा प्रयत्न यानिमित्ताने करत असतात. दरवर्षी विजयादशमीच्या दिवशी केले जाणारे रावण दहन हे सत्प्रवृत्तीने दुष्प्रवृत्तीवर, सत्याने असत्यावर मिळविलेल्या विजयाचे प्रतीक असून या प्रथेला विरोध करण्याचे काहीच कारण नाही.

**- सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## कानगाव शाळेत भोंडला...



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, दौंड :** कानगाव तालुका दौंड येथील जिल्हा परिषद शाळेत पारंपरिक भोंडला कार्यक्रम घेण्यात आला. शुक्रवार दिनांक ११ ऑक्टोबर रोजी शाळेतील सहशिक्षिका संध्या कुंभार आणि शोभा कोष्टी यांच्या पुढाकारातून हा कार्यक्रम घेण्यात आला. शाळेचे मुख्याध्यापक शामराव जगताप यांच्या हस्ते हत्तीची पूजा करून भोंडल्याची सुरुवात करण्यात आली. भोंडल्याच्या सुरुवातीला श्याम ठाणेदार सरांनी विद्यार्थ्यांना भोंडल्याचा इतिहास व परंपरा सांगितली. त्यानंतर हत्तीच्या प्रतीमेसमोर फेर धरून सर्वांनी अनेक गाणी गायली. भोंडल्यासाठी निवडलेली गाणी विविध सामाजिक संदेश देणारी होती. मुलगा मुलगी कोणताही भेदभाव न करता सर्वांना या भोंडल्यात सहभागी करून घेण्यात आले. सर्वांनी भोंडल्याचा मनसोक्त आनंद लुटून खिरापतीचा आनंद लुटला. भोंडल्यात शाळेतील सर्व विद्यार्थी आणि शिक्षक सहभागी झाले. भोंडला यशस्वी करण्यासाठी शाळेतील सहशिक्षक राजेंद्र जगताप सखाराम खोमणे, एकनाथ हराळ, प्रकाश लकडे या शिक्षकांनी प्रयत्न केले.

## हडपसर भागात खोक्यात तरुणाचा मृतदेह सापडला

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, पुणे :** तरुणाचा खून करुन मृतदेह खोक्यात बांधून फेकून दिल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. हडपसर भागातील हिंगणे मळा परिसरातील कालव्याजवळ खोके सापडले. खून झालेल्या तरुणाची ओळख पटलेली नाही.

हिंगणे मळा परिसरात शुक्रवारी सायंकाळी एक खोके नागरिकांनी पाहिले. तरुणाचे हात पाय बांधण्यात आले. खोके बंद करून ते कालव्याजवळ असलेल्या मोकळ्या जागेत फेकून देण्यात आले होते. याबाबतची माहिती रहिवाशांनी पोलिसांना दिली. त्यानंतर हडपसर पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचले. खून झालेल्या तरुणाचे वय अंदाजे ३० ते ३५ वर्ष आहे. त्याची ओळख पटलेली नाही. खून झालेल्या तरुणाची ओळख पटविण्याचे काम सुरू असल्याची माहिती हडपसर पोलिसांनी दिली. तरुणाचा खून वैमनस्य किंवा अनैतिक संबंधातून झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. पोलिसांनी शहरातून बेपत्ता झालेल्या तरुणांची माहिती संकलित करण्यास सुरुवात केली. खून झालेला तरुण हडपसर, लोणी काळभोर भागातील असल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

## आदर्श विद्यालयाच्या खेळाडूंचे जिल्हास्तरीय शालेय सेपकटकरा स्पर्धेत यश

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, पुणे :** तरुणाचा खून करुन मृतदेह खोक्यात बांधून फेकून दिल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. हडपसर भागातील हिंगणे मळा परिसरातील कालव्याजवळ खोके सापडले. खून झालेल्या तरुणाची ओळख पटलेली नाही.

हिंगणे मळा परिसरात शुक्रवारी सायंकाळी एक खोके नागरिकांनी पाहिले. तरुणाचे हात पाय बांधण्यात आले. खोके बंद करून ते कालव्याजवळ असलेल्या मोकळ्या जागेत फेकून देण्यात आले होते. याबाबतची माहिती रहिवाशांनी पोलिसांना दिली. त्यानंतर हडपसर पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचले. खून झालेल्या तरुणाचे वय अंदाजे ३० ते ३५ वर्ष आहे. त्याची ओळख पटलेली नाही. खून झालेल्या तरुणाची ओळख पटविण्याचे काम सुरू असल्याची माहिती हडपसर पोलिसांनी दिली. तरुणाचा खून वैमनस्य किंवा अनैतिक संबंधातून झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. पोलिसांनी शहरातून बेपत्ता झालेल्या तरुणांची माहिती संकलित करण्यास सुरुवात केली. खून झालेला तरुण हडपसर, लोणी काळभोर भागातील असल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

## खारघरमधील स्वप्नपूर्ती संकुलात अपुरा पाणीपुरवठा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, पनवेल :** खारघर येथील सिडकोने उभारलेल्या स्वप्नपूर्ती गृहसंकुलातील १० हजार रहिवाशांना गेले आठ दिवस अपुरा पाणीपुरवठा होत आहे. स्वप्नपूर्ती गृहसंकुलातील रोजच्या आठ लाख लिटरऐवजी केवळ अडीच लाख लिटर पाण्याचा पुरवठा केला जात असल्याने असमान वाटपाचे नवे संकट नागरिकांवर ओढवले आहे. त्यामुळे सध्या विकतच्या बाटलीबंद पाण्यावर गुजराण करण्याची वेळ आली आहे.

धरणात पाणी पुरेसे असले तरी स्वप्नपूर्ती गृहनिर्माणात पुरवठा करण्यासाठी सिडकोकडे पाणी नसल्याने रहिवासी संतापले आहेत. पावसाळ्यातही या गृहनिर्णातील रहिवाशांनी पाणीटंचाईचा सामना केला होता. मागील महिन्यात काहीवेळ पाणीपुरवठा सुरळीत होता, मात्र पुन्हा तीच परिस्थिती निर्माण झाली आहे.

स्वप्नपूर्ती सोसायटीतील नागरिकांसमोर पाणीप्रश्न बिकट झाला आहे. गुरुवारी जलवाहिनीच्या दुरुस्तीच्या कामामुळे संपूर्ण खारघरमध्ये २४ तासांचा पाणीपुरवठा बंद होता. त्यानंतर अजूनही पाणीपुरवठा पूर्ववत होऊ शकला नाही. स्वप्नपूर्ती गृहसंकुलातील रहिवाशांच्या लोकसंख्येनुसार या सोसायटीला दररोज आठ लाख लिटर पाणीपुरवठा करणे आवश्यक आहे. मात्र, प्रत्यक्षात अवघा ६ ते ७ लाख लिटर पाणी हिस्सा मिळत आहे. त्यामुळे संकुलातील जलवितरणावर ताण आला आहे.

### खारघरमधील स्वप्नपूर्ती संकुलात अपुरा पाणीपुरवठा

घरे बांधून तयार आहेत. लवकरच सोडत प्रक्रियेनंतर पुढील तीन महिन्यांत घरांचा ताबा मिळाल्यानंतर एक लाख नवीन घरांमध्ये नागरिक राहण्यासाठी येणार असल्याने हीच पाण्याची स्थिती असल्यास नवीन येणाऱ्या नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे.

पाण्याचा बाटला खरेदी करावा लागत असलेल्या स्वप्नपूर्ती संकुलामधील सदनिकाधारकांना सिडको मंडळाने दोन वर्षांचे थकीत मेन्टेनन्स शुल्क दरमहा दोन हजार रुपये आकारल्याने रहिवाशांना सव्वा लाखांहून अधिक रक्कम एकदाच भरावी लागणार आहे. अत्यल्प व अल्प उत्पन्न गटांतील तीन हजार सदनिकांची एकच गृहनिर्माण संस्था सिडको मंडळाने स्थापन केल्यामुळेही गृहनिर्माण संस्था चालविण्यासाठी अडचणी येत आहेत.

सिडको मंडळाने पहिल्यांदा पाणीपुरवठा सुरळीत करावा आणि पंतप्रधान आवास योजनेतील अत्यल्प उत्पन्न गटातील नागरिकांकडून माफक दरात देखभाल शुल्क आकारावे त्यानंतरच नव्या महागृहनिर्माणांना भोगवटा प्रमाणपत्र द्यावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. याबाबत सिडकोच्या जनसंपर्क विभागाच्या अधिकारी प्रिया रातांबे यांच्याशी संपर्क साधला असता प्रतिसाद मिळाला नाही.

## पाटण येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नामांतरण

**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**

**दि.१२, सातारा :** राज्य शासनाने राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे नामांतरण करण्याचा निर्णय घेतला आहे, यामधे पाटणच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा समावेश असून लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या राजकीय सामाजिक जीवनकार्यात धर्मपत्नी वत्सलादेवी दैसाई यांचा मोलाचा वाटा होता. या अनुषंगाने राज्य शासनाने पाटण औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे कै.सौ.वत्सलादेवी देसाई औद्योगिक प्रशिक्षण संस्था पाटण असे नामांतरण केले आहे. अपर जिल्हाधिकारी जीवन गलांडे यांनी सांगितले

नामांतरण कार्यक्रमाप्रसंगी तहसिलदार अनंत गुरव, मोरणा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रविराज देसाई, कारखान्याचे संचालक बळीराम साळुंखे, गोरख देसाई, सदानंद साळुंखे, सलीम इनामदार, सागर माने, मिलींद पाटील, हणमंतराव शिर्के, राजेद्र पुजारी संस्थेचे प्राचार्य मनिष मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

रविराज देसाई पुढे म्हणाले, लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या जडणघडणीत ताईसाहेबांनी मोठे योगदान दिले. ताईसाहेबाचे आचार विचार हे नव्या पिढीसाठी आदर्श असून त्या विचारानेच प्रेरीत होऊन आमच्या देसाई कुटुंबासह अनेक जण सामाजिक व इतर क्षेत्रात दिसत आहेत. ताईसाहेबांचे विचार व कार्य युवा पिढीसाठी नेहमीच प्रेरणादायी राहतील, असे सांगून राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री अजित पवार व जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई या निर्णयाबद्दल आभारही मानले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक के.एम पाटोळे यांनी केले तर प्राचार्य एम.बी.मोरे यांनी आभार मानले. या कार्यक्रमास शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

## तेर ते तुळजापूर या ४२ कि मी रस्त्याची होणार सुधारणा...



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, धाराशिव :** आशियाई विकास बँक अर्थसाहित प्रकल्प ३ अंतर्गत धाराशिव तालुक्यातील कळंब- ढोकी- तेर- बेंबळी- तुळजापूर - अक्कलकोट राज्य मार्गावरील तेर ते तुळजापूर दरम्यानच्या ४२ किमी लांबीच्या रस्त्याची सुधारणा करण्याच्या कामाचे भूमिपूजन आज ११ ऑक्टोबर रोजी रोजी धाराशिव तालुक्यातील चिखली चौरस्ता येथे आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

मंत्रालयातून या ई- भूमिपूजन प्रसंगी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा म्हैसकर-पाटणकर व ब्रिजेश दीक्षित यांची तर चिखली चौरस्ता येथे आयोजित कार्यक्रमस्थळी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष नेताजी पाटील, माजी जि.प.उपाध्यक्ष सुधाकर गुंड,धाराशिव पंचायत समितीचे माजी सभापती बालाजी गावडे,नितीन काळे, मजूर फेडरेशनचे चेअरमन नारायण नन्नवरे व सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता शेषराव चव्हाण व उपविभागीय अभियंता श्री.आव्हाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

रस्त्याचे भूमिपूजन केल्यानंतर आयोजित कार्यक्रमात बोलताना आमदार राणाजगजीतसिंह पाटील म्हणाले, जिल्ह्यातील रस्त्यांच्या विकासासाठी राज्य सरकारने मोठा निधी उपलब्ध करून दिला आहे. या रस्त्याचे काम पूर्ण झाल्यावर या मार्गावर मोठ्या प्रमाणात रहदारी सुरू होणार आहे. जिल्ह्यात पर्यटन वाढीला चालना देऊन त्या माध्यमातून जास्तीत जास्त रोजगार निर्मिती कशी होईल यावर भर देण्यात आला आहे. तुळजापूर येथे जवळपास २ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करून तुळजापूरचा कायापालट होणार आहे.भक्तनिवास व इतर सुविधा निर्माण करण्यात येणार आहे. तुळजापूर येथे येणाऱ्या भाविकांमुळे रोजगार निर्मितीला चालना मिळण्यास मदत होणार आहे.तेर येथे संत गोरोबा काकांच्या मंदिराच्या कामाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे या मंदिराचा कायापालट होणार आहे. तेर गावाच्या विकासाची नियोजन केले असून तेथे असलेल्या प्राचीन वास्तूंचा जीर्णोद्धार करण्यात येत आहे असे ते म्हणाले.

राज्य सरकारने जिल्ह्याच्या विकासासाठी भरीव निधी दिला असल्याचे सांगून आमदार राणाजगजितसिंह पाटील पुढे म्हणाले,अनेक वर्षापासून रेंगाळलेली मोठी अनेक कामे सुरू करण्यात आली आहे. जिल्ह्यातील शेतीच्या विकासात पाण्याचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. तत्कालीन मंत्री डॉ.पदमसिंह पाटील यांच्या दूरदृष्टीतून जिल्ह्यात अनेक सिंचन प्रकल्प कार्यान्वित झाल्याने उसाचे क्षेत्र वाढले आहे.त्यामुळे आज ३० पेक्षा जास्त साखर कारखाने आणि गुळ पावडरचे युनिट जिल्ह्यात सुरू झाले आहे.आणखी काही युनिट नव्याने सुरू होणार आहे.नागरिकांच्या जीवनशैलीत बदल होऊन अर्थकारणात फरक पडला आहे. पश्चिम महाराष्ट्रातील पाणी मराठवाड्यात तुळजापूर तालुक्यातील रामदरा येथे येणार आहे. कृष्णा खोऱ्यातील आपल्या हक्काचे पाणी जिल्ह्यातील आठही तालुक्यात येणार आहे.जिल्ह्यात रेल्वेचे काम सुरू झाले आहे.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय धाराशीव येथे सुरू झाले आहे.यासाठी राज्य सरकारने निधी उपलब्ध करून दिल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला चिखली परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री शेषराव चव्हाण यांनी केले. संचालन श्रीमती वृषाली तेल्लोरे यांनी तर उपस्थितांचे आभार उपविभागीय अभियंता श्री.आव्हाडे यांनी मानले.

## पुणे पिंपरी चिंचवड भागात स्थायिक माढ्यातील मतदारांशी अभिजीत पाटलांचा संवाद



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१२, माढा :** श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे कर्तव्यतत्पर आणि गतिमान चेअरमन अभिजित पाटील यांनी माढा विधानसभा लढविण्याच्या दृष्टीने जोरदार तयारी सुरू केली आहे. माढा विधानसभा मतदारसंघातून आमदार होण्यासाठी या भागातील मतदारांची जनसंपर्क वाढवण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे.

माढा तालुक्यातील मतदार असलेल्या पिंपरी चिंचवड आणि पुणे शहरात स्थायिक झालेल्या नागरिकांशीही गुरुवारी संवाद साधला असून,विकासाचे व्हिजन असलेल्या चेअरमन अभिजीत पाटील यांना या मतदानातून उत्स्फूर्त प्रतिसाद देण्यात आला आहे. पिंपरी चिंचवड भागातील मतदारांना कलासागर हॉल येथे सकाळी तर पुणे येथील मतदाराशी हडपसर येथील राजयोग लॉन्स याठिकाणी जनसंवाद साधला आहे. या संवाद कार्यक्रम प्रसंगी माढा मतदारसंघात मूलभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, रोजगार निर्मिती, महिला सक्षमीकरण, तसेच उद्योग निर्मिती अशा विविध विषयावर प्रत्येकाने आपली भूमिका मांडली. पुणे-मुंबई सारखं आपलं गाव, आपल्या तालुक्यात सुधारणा व्हावी यासाठी प्रत्येकाची तळमळ दिसत होती. त्याच मताचा मी जाहीरनामा (विकासाची ब्लू प्रिंट) तयार करणार असून लवकरच तो आपल्या समोर सादर केला जाईल. असे अभिजित पाटील यांनी विश्वास देऊन सांगितले.

आपल्या घरचा माणूस भेटल्यानंतर बोलल्यानंतर नवीनच एक ऊर्जा आणि बळ मिळतं, त्याची प्रचिती आली. नक्कीच दरवर्षी या स्नेहमेळाचा आयोजन आणि एकत्र येण्याचा संकल्प करून प्रत्येकाच्या सुख, दुःखामध्ये उभे राहण्याचं आश्वसनही यावेळी उपस्थित मतदारांना देण्यात आले. यावेळी या बांधवांचं प्रेम आणि भरभरून प्रतिसाद पाहता नक्कीच येत्या काळात यश मिळेल अशी आशाही अभिजित पाटील यांनी व्यक्त केली आहे. यावेळी हजारोच्या संख्येने मतदार, युवक तरूण मंडळीसह, महिला भगिंनी देखील उपस्थित होत्या.

> माढा मतदारसंघातील पुणे, पिंपरी चिंचवड शहरामध्ये स्थायिक झालेल्या नागरिकांशी संवाद साधला असून मूलभूत सोयीसुविधा, शिक्षण, आरोग्य, रोजगार निर्मिती, महिला सक्षमीकरण तसेच उद्योग निर्मिती अशा विविध विषयांवर काम करून पुणे-मुंबई सारखी आपले गाव आपल्या तालुक्यात सुधारणा व्हावी. यासाठी काम करणार असून नागरिकांचे व्हिजन डोळ्यासमोर ठेवूनच आपला विधानसभेचा विकास कामाचा अजिंठा असणार असा विश्वास उपस्थित नागरिकांना अभिजीत पाटील यांनी दिला.

## माढ्यामध्ये विठ्ठल प्रतिष्ठानचेवतीने १२ ऑक्टोबरपासून सांस्कृतिक महोत्सवाचा थरार



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.११, माढा :** श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत आबा पाटील यांच्या संकल्पनेतून व विठ्ठल प्रतिष्ठान यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या माढा कृषी व संस्कृती महोत्सव २०२४ या दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर सुरू होणाऱ्या या महोत्सवासाठी उभारण्यात येणाऱ्या भव्य शामियाना आणि मंडप पूजन अभिजीत पाटील यांच्या हस्ते पार पडले.

या कार्यक्रमाचे आयोजन रयत शिक्षण संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय सोलापूर रोड माढा येथे करण्यात आले आहे. शनिवार दिनांक १२ ते बुधवार दिनांक १६ ऑक्टोबर २०२४ या पाच दिवस चालणाऱ्या कृषी व सांस्कृतिक महोत्सवामध्ये कृषी विषयक तज्ञांचे मार्गदर्शन, महाराष्ट्रातील प्रसिद्ध कलाकारांच्या उपस्थितीत संस्कृती कार्यक्रम तसेच साहित्य आणि प्रदर्शन येथील नागरिकांना पाहावयास मिळणार आहे.

या महोत्सवाची सुरुवात शनिवार दिनांक १२ ऑक्टोबर २०२४ रोजी दसऱ्याच्या दिवशी सकाळी १० वाजता भव्य शेतकरी मेळाव्याने होणार आहे. या दिवशी दसरा असल्याने सायंकाळी ६ वाजता रावण दहन या कार्यक्रमाचे करण्यात आले आहे.

तसेच रविवार दिनांक १३ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता हवामान तज्ञ पंजाबराव डक यांचे मार्गदर्शन, सायंकाळी ६ वाजता अभिनेत्री मानसी नाईक यांचा महाराष्ट्राचे हास्यविर कार्यक्रम ठेवण्यात आला आहे. सोमवार दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता आदर्श सरपंच भास्करराव पेरे-पाटील यांचे मार्गदर्शन तसेच सायंकाळी ६ वाजता ह.भ.प निवृत्ती महाराज इंदुरीकर यांच्या कीर्तन व भारुड कार्यक्रम होणार आहे. तसेच मंगळवार दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता नफ्यातील दुग्ध व्यवसाय या विषयावर गंगाप्रसाद पाटील यांचे मार्गदर्शन आणि सायंकाळी ६ वाजता महाराष्ट्राचे कॉमेडी कलाकार भाऊ कदम व मकरंद अनासपुरे यांच्या मनोरंजनाच्याकार्यक्रमाचा आनंद नागरिकांना घेता येणार आहे.

तसेच कार्यक्रमाच्या शेवटच्या दिवशी बुधवार दिनांक १६ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता अरुण देशमुख कृषी विद्या विभाग प्रमुख यांचे मार्गदर्शन व सायंकाळी ६ वाजता महाराष्ट्राचा महागायक आनंद शिंदे यांचा लोकगीताचा कार्यक्रम ठेवण्यात आला आहे.

माढा कृषी व सांस्कृतिक महोत्सवाच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांचा लाभ येथील नागरिकांनी घ्यावा. असे आवाहन चेअरमन अभिजीत पाटील यांनी केले आहे.

यावेळी प्राचार्य सुनील हेळकर, अनिलकाका देशमुख मानेगाव, आबासाहेब साठे, ऋषीकाका तंबिले, अक्षय शिंदे, जितु जमदाडे, स्वाभिमान कदम उपस्थित होते.

# फेवर ब्लॉकच्या बोगस कामाची चौकशी करा

**अक्षराज : बालाजी गायकवाड**

**दि.१२, हदगाव (नांदेड) :** हदगाव तालुक्यातील तामसा शहरातील साठे नगर आंबेडकर नगर येथे दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या फेवरब्लॉक, गटुचे काम हे अतिशय निकृष्ट दर्जाचे केले असून त्या कामाची तात्काळ चौकशी करून संबंधितावर कारवाई करत त्यांचे देह एकदा करू नये. अन्यथा आपल्या कार्यालयासमोर आम रण उपोषणास बसण्यात येईल. असा इशारा तामसा येथील सामाजिक कार्यकर्ते सुरेश वाघमारे व पत्रकार बालाजी गायकवाड यांनी हदगावच्या गटविकास अधिकाऱ्यांकडे एका निवेदनाद्वारे दिला आहे.



दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, साठे नगर आंबेडकर नगर दलित वस्तीमध्ये शासनाकडून दलित वस्तीची सुधारणा करण्यासाठी ग्रामपंचायतच्या अधिपत्याखाली फेवरब्लॉक गट्टू चे काम नुकतेच करण्यात आले आहे परंतु करण्यात आलेले काम हे संबंधित गुत्तेदाराने अधिकाऱ्यांना हाताशी धरून अतिशय निकृष्ट दर्जाचे करून त्या कामांमध्ये माती मिश्रित बारीक चुरीचा वापर करण्यात आला आहे. याशिवाय त्या कामांमध्ये अतिशय कमी प्रमाणात सिमेंटचा देखील वापर केला असल्याने सदर फेवरब्लॉक हे पावसाळ्याच्या पाण्याने पूर्तता निघून जात असल्याचे दिसून येत आहे.

विशेष म्हणजे करण्यात आलेल्या फेवरब्लॉगच्या कामावर कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी येऊन पाहाणी सुद्धा करण्यात आली नसल्याने त्या कामाची म ोजमाप पुस्तिका हे आपल्या कार्यालयात बसूनच तयार केली असल्याचे समजते मात्र दलित वस्तीमधील फेवरब्लॉगचे काम मजबूत व टिकाऊ दार व्हावे. अशी अपेक्षा दलित वस्तीतील नागरिकांमध्ये होती.

परंतु निकृष्ट दर्जाचे काम केल्यामुळे फेरबुलाचे गट्टू आत्ताच उकळून जात आहेत. त्यामुळे केलेल्या कामावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. तेव्हा करण्यात आलेल्या कामाची तात्काळ चौकशी करून संबंधित गुतेदाराला बिले अदा करू नये. अन्यथा आपल्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल. असा इशारा सामाजिक कार्यकर्ते सुरेश वाघमारे व पत्रकार बालाजी गायकवाड यांनी हदगावच्या गटविकास अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनामध्ये म्हटले आहे.

# शिळगांवाच्या श्री खरवलीआईच्या मंदिरात दर्शनासाठी भक्तांची १० दिवस गर्दी

## नवसाला पावणारी, हाकेला धावणारी आणि भक्तांची रक्षण करणारी देवी

**अक्षराज : विनोद वास्कर**


**दि.१२, शिळफाटा (ठाणे) :** मुंब्रा पनवेल मार्गावर हवे लगत असलेल्या शिळगावाच्या च्या सह्याद्रीच्या पर्वताम ध्ये खरवलीआईच्या डोंगरावर श्री खरवलीआईच मंदिर आहे. हे मंदिर खूप प्राचीन आहे. हजारो वर्षांपूर्वी श्री खरवलीआई स्वतः प्रत्येक दिवशी शिळगावांच्या ग्रामस्थांच्या रक्षणासाठी रात्री पहारा देत असे.

श्री खरवलीआई सिंगार करून नटून थटून अंगावर दागिने परिधान करून नेहम ीप्रमाणे पहारा देत होती. ती रात्र होती अश्विन पुनवेर्ची होती. त्यादिवशी तिथून लष्कर जात होते. त्यांची नजर आईवर पडते. त्या लष्करांना वाटले की एखादी महिला शिंगार करून उभी आहे. त्यांना माहीत नव्हतं देवी आहे. लष्कराच्या मनात आले की त्या महिलेच्या अंगावर असलेले दागिने काढून घ्यावे त्यासाठी त्यांनी आईच्या बरोबर लढाई केली. पण आईने त्यांना सोडले नाही त्यांना शिक्षा दिलीच.

आई अंगावर सुद्धा लष्कराने शस्त्र चालल्यामुळे आईच्या अंगावर वार झाले होते. त्यामुळे आईला राग आला. आई रागाच्या भरात त्या दिवशी सह्याद्रीच्या पर्वतामध्ये करडोंगरीच्या डोंगरावर कलमाच्या झाडाखाली एका दगडाच्या कपारी मध्ये जाऊन बसली. तेव्हापासून ती तिथेच बसून आहे. आणि ती मूर्ती स्वयंभू आहे. आजही महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भावीक भक्त आईच्या दर्शनासाठी येत असतात.

नवरात्रीमध्ये लाखोच्या संख्येने भाविक आपले नवस फेडण्यासाठी येत असतात. आगरी कोळ्यांची श्री खरवली आई नवसाला पावणारी, हाकेला धावणारी, आणि सदैव भक्तांच्या पाठीशी उभी राहणारी, रक्षण करणारी अशी देवी आहे. आईचा महिमा खूप आहे आणि ही देवी जागृत सुद्धा आहे. एकविरा आईची छोटी बहीण म्हणून ओळखली जाते. एकविरेच्या आईचे दर्शन घेण्यासाठी जाणारे किंवा दर्शन घेतल्यानंतर भक्त शिळगावच्या श्री खरवलीआईच्या मंदिरात सुद्धा आईचे दर्शन घेण्यासाठी येत असतात.

आईच्या मंदिराच्या पहिल्याच पायरीला हनुमंताचे स्थान आहे. आईच्या मंदिरात गणेशाची मूर्ती, आई भवानीची मूर्ती, म्हसोबाची मूर्ती, आणि



बाप देवाची मूर्ती सुद्धा आहे. आईच्या मंदिराला ३२२ पायऱ्या आहेत. आणि त्या चढूनच आईच्या मंदिरापर्यंत पोचता येतो.

नवरात्री उत्सवासाठी यावर्षी श्री खरवलीआई सेवा ट्रस्ट शिळगांव यांच्याकडून खूप चांगलं असं नियोजन करण्यात आलं होतं. येणाऱ्या भक्तांसाठी नाष्टा, पाणी आणि चहा पाण्याची सोय करण्यात आली होती. तसेच मंदिराच्या परिसरामध्ये आढळणाऱ्या, असलेल्या प्राण्यांची, सापांची, फुलांची, फळांची, बॅनर लावून सेल्फी पॉईंट बनवण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराज आई जगदंबेची पूजा करत असल्याचे बॅनर सुद्धा लावण्यात आले होते. आईच्या नावाने डिस्प्ले बोर्ड बनवून सेल्फी पॉईंट सुद्धा बनवण्यात आले होते.

संपूर्ण मंदिरांना लाइटिंग सुद्धा लावण्यात आली होती. अष्टमीच्या दिवशी होम हवन सुद्धा करण्यात आले. त्यासाठी पंचक्रोशीतील चार जोडपे आले होते. प्रियंका सज्जन बाळाराम पाटील शिळगांव, अंजली हरिचंद्र भोईर नारिवली गांव, विजय म्हात्रे उसारघर, रूपाली विनोद वास्कर शिळगांव या सर्वांच्या हस्ते होम हवन करण्यात आले.

अष्टमीच्या दिवशी महाप्रसादाचा भक्तांनी लाभ घेतला. नवरात्रीच्या पहिल्या दिवसापासून तर दसऱ्यापर्यंत लाखोच्या संख्येने भावी दर्शनासाठी येत होते. आलेल्या भाविक भक्तांचे ट्रस्ट कडून सत्कार सुद्धा करण्यात आले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही आईच्या मंदिरात मोठ्या उत्साहात जल्लोषात नवरात्री उत्सव आणि घटस्थापना साजरी करण्यात आली. दर्शनासाठी भक्तांची गर्दी सुद्धा झाली होती. अनेक भक्त नवस फेडण्यासाठी सुद्धा आले होते.

# पनवेल महानगरपालिकेच्या ८४ कोटींच्या विकास कामांचे आमदार ठाकूर यांच्या हस्ते भूमीपूजन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.११, पनवेल :** पथदिव्यापासून रस्ते, जलकुंभ, बगीचे, विरंगुळा केंद्र, खेळाची मैदाने अशा म हापालिकेच्या विविध ८४ कोटी रुपयांच्या कामांचे दिनांक ११ ऑक्टोबर २०२४ रोजी भूमीपूजन झाले. तसेच नुकतेच महापालिकेच्या ३०२ कोटी रुपयांच्या कामाचा शुभारंभ झाला आहे.

या कामांच्या माध्यमातून आयुक्त मंगेश चितळे यांच्या नेतृत्वाखाली सर्व अधिकाऱ्यांची टिम, म हानगरपालिका ताकदीने इन्फ्रास्ट्रक्चर उभा करते आहे. पनवेल महानगरपालिकेच्या विविध विकास कामांचा भूमीपूजन सोहळा दिनांक ११ ऑक्टोबर रोजी झाला. यावेळी पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते. यावेळी आयुक्त मंगेश चितळे, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक, नगरसेविका, उपायुक्त कैलास गावडे,

उपायुक्त डॉ. वैभव विधाते, शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, डॉ.सहायक आयुक्त स्मिता काळे, सहायक आयुक्त डॉ. रुपाली माने, सहायक आयुक्त सुबोध ठाणेकर, कार्यकारी अभियंता सुधीर सांळुखे, उप अभियंता विलास चव्हाण, राजेश कर्डिले, इतर मान्यवर, महापालिका अधिकारी व कर्मचारी, परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. खारघर मधील शिल्प चौक जवळील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके उद्यानामध्ये प्लास्टिक बाटली इको ब्रीक पेटीचे उद्घाटन यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

रिसायकलिंगचे चिन्ह असणाऱ्या प्लास्टिकच्या बाटल्यांचा इको ब्रीकमध्ये वापर करता येतो. अशा वापरलेल्या बाटल्यांचे संकलन करण्यासाठी हे संकलन केंद्र सुरू करण्यात आले आहे.

**यावेळी पुढीलप्रमाणे भूमीपूजन समारंभ झाले -**




१) पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती अ, प्रभाग क्र. ०१ कोयनावेळे व घोट या गावांना जोडणाऱ्या रस्त्यावरील तळोजा नदीवरील पूल बांधकाम करणे.

२) केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान २.० अंतर्गत सिध्दी करवले तलाव पुनरूज्जीवन व सुशोभिकरण करणे.

३) केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान २.० अंतर्गत आडीवली तलाव पुनरूज्जीवन व सुशोभिकरण करणे.

४) अमृत अभियान २.० पाणी पुरवठा योजनेअंतर्गत मुर्बी येथे १.७५ लक्ष लिटर्स क्षमतेचा उंच जलकुंभ बांधणे व डी आय पाईपची वितरण व्यवस्था करणे.

५) पनवेल महानगरपालिका हद्दीतील खारघर येथील प्लॉट नं १३, से. १६ येथे खेळाचे मैदान विकसित करणे.

६) पनवेल महानगरपालिका हद्दीतील खारघर येथील प्लॉट नं. २५, २५बी, से. १५, येथे विरंगुळा केंद्र बांधकाम करणे.

७) पनवेल महानगरपालिका हद्दीतील खारघर येथील प्लॉट नं. २५, २५वी, से. १५, येथे उद्यान विकसित करणे.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण सन २०२२-२३ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान जिल्हा स्तर अंतर्गत पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील विविध तलाव व गार्डन परिसर विद्युत व्यवस्थेसह विकसित करणे.

९) खारघर सेक्टर-५, प्लॉट नं.१० व १९ येथे उद्यान विकसित करणे.

१०) पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील मुलभुत सोयी सुविधांच्या विकासासाठी महाराष्ट्र शासनाच्या विशेष तरतूद वितरीत निधी अंतर्गत पनवेल म हानगरपालिका क्षेत्रात एकूण ६४ ठिकाणी सोलार हायमास्ट बसविणे.

११) अमृत अभियान २.० पाणी पुरवठा योजने अंतर्गत बेलपाडा येथे ४.८० लक्ष लिटर्स क्षमतेचा उंच जलकुंभ बांधणे dl पाईपची वितरण व्यवस्था करणे.

१२) पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील दुभाजकांचे सौंदर्यीकरण करणे.

१३)महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हा स्तर) २०२४-२५ योजने अंतर्गत पनवेल म हानगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध उद्यानांचा विकास करणेसाठी नवनवीन साधने उपलब्ध करून देणे.

१४) महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हा स्तर) २०२४-२५ योजने अंतर्गत पनवेल म हानगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध उद्यानांचा विकास करण्यासाठी मुलांच्या विरंगुळ्यासाठी आधुनिक व आकर्षक साधने उपलब्ध करून देणे.

१५) महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हा स्तर) २०२४-२५ योजने अंतर्गत पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध उद्यानात कलाकृती निर्मिती करणे.

# थोडक्यात

## आजपासून श्रीक्षेत्र वडवाळीत श्री बालाजी लळित यात्रा महोत्सव

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, पैठण (छ.संभाजीनगर) :** गोदावरी - वडवा- कानडी नद्यांच्या पवित्र त्रिवेणी संगमावर असलेल्या श्रीक्षेत्र वडवाळी येथील ७८ व्या श्री लक्ष्मी बालाजी लळित यात्रा महोत्सवाला अश्विन वद्य १० रविवार दिनांक १३ ऑक्टोबर पासून पारंपरिक पद्धतीने प्रारंभ होत आहे.



शनिवार, दिनांक १९ आक्टोबर पर्यंत चालणाऱ्या या महोत्सवातील अखंड हरिनाम सप्ताहात ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, काकडा भजन, विष्णू सहस्त्रनाम, तुकाराम महाराज गाथा भजन, संगीत भावार्थ रामायण, हरिपाठ, वाघाडी, मायगाव, नायगाव, पाटेगाव, नाटकरवाडी, सायगाव, तेलवाडी, चनकवाडी, रहाटगाव, सोलनापुर, आखदवाडा, ज्ञानेश्वरवाडी, दादेगाव, आनंदपुर, जैनपुरा, चांगतपुरी, आगर नांदर, आपेगाव, माळवाडी, नांदर, मुंगी, खिर्डी या गावातील भजनी मंडळांचा हरिजागर आदी दैनंदिन धार्मिक कार्यक्रम तसेच हभप वैभव महाराज राक्षे (देहू), आदिनाथ महाराज फपाळ (माजलगाव), कृष्णा महाराज नवले (पैठण), ज्ञानेश्वर महाराज शिंदे (आळंदी), अनिरुद्ध महाराज क्षिरसागर माळसावरगाव, पोपट महाराज क्षिरसागर (कासारखेड), चांगदेव महाराज काकडे (काकडेकंडारी), शिवनाथ महाराज मैंदड (श्रीक्षेत्र वडवाळी) यांची हरि किर्तन व भव्य भंडारा महाप्रसादाने सांगता होईल.

## मुदखेड राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरद पवार गटाची आढावा बैठक संपन्न

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.११, मुदखेड (नांदेड) :** महाराष्ट्र राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची आढावा बैठक नुकतीच शहरातील शासकीय विशामगृह येथे घेण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा कार्याध्यक्ष भास्कर भिलवंडे तर प्रमुख उपस्थिती म्हणून राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष धनंजय सूर्यवंशी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाप्रसंगी प्रसंगी जिल्हाध्यक्ष धनंजय सुर्यवंशी मनोगत व्यक्त करताना म्हणाले, मागील लोकसभा निवडणुकीत नांदेड जिल्ह्यांचे दिवंगत खा.वसंतराव चव्हाण यांना निवडून आणण्यासाठी नांदेड जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातील सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांनी कोणतीही अपेक्षा न ठेवता एकदम निष्ठेने व प्रामाणीक पने काम केलं. आणि त्याचा आपण निकाल पाहीला या ठिकाणी शक्य नसलेली गोष्ट शक्य झाली. यामुळे काँग्रेस महाविकास आघाडीचा उमेदवार निवडून आला असल्याचे आपल्या मनोगत सांगितले.

तसेच युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष धनंजय सुर्यवंशी यांच्या उपस्थितीत असंख्य कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात पक्ष प्रवेश केला. यावेळी कार्याध्यक्ष चंद्रकांत टेकाळे, दशरथ कदम, जितेन्द्र काळे, अभिजीत पांचाळ, मुजाहीद शेख, राजेश कंधारे, भोकर तालुकाध्यक्ष उमेश पाटील कापसे, अर्धापुर तालुका अध्यक्ष गजानन लढे, भोकर शहर कार्याध्यक्ष लखन वर्शे वार, श्याम चोंडे, गजानन गोरख, शिवम कदम, गणेश कदम, पप्पू पाटील जाधव, दत्ता पाटील कदम,अमोल हटकर, गौतम हटकर, गजानन जाधव, अमोल मुंगल, रामेश्वर मुंगल, प्रताप शिंदे, उद्धव थोरात, आदित्य कळणे, तेजस पाटील, गोपीराज मुंगल, दिनेश निखाते, नंदू पानेवार, यांच्या सह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते यांची उपस्थिती होती. या बैठकीचे आयोजन मुदखेड तालुकाध्यक्ष केशव पाटील मुंगल ईजळीकर व शहराध्यक्ष बालाजी बळे यांनी केले.

## धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात साजरा

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१२, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड शहरातील बौध्द प्रशिक्षण केंद्र, भीमनगर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजित पुतळ्याच्या ठिकाणी नविआबादी, अशोका नगर, सिद्धार्थ नगर, समता नगर, लुंबीनी नगर, बौध्द धम्मस्थळ माळ याठिकाणी शनिवार, दिनांक १२ ऑक्टोबर रोजी भन्ते गगनबोधी यांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध, सम्राट अशोक, बोधीसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पंचशील ध्वज फडकवून धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सम्राट अशोकांनी इसवी सन पूर्व तिसऱ्या कलिंग युद्धानंतर बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. इतिहासात हा दिवस अशोक विजयादशमी म्हणून गणना गेला. विसाव्या शतकात १४ ऑक्टोबर १९५६ रोजी याच अशोक विजयादशमीच्या दिवशी बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी येथे सपत्निक बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. आपल्या ५ लाख अनुयायांना दीक्षा दिली. बाबासाहेबांनी आपल्या या अनुयायांना धम्मदीक्षा पूर्वी स्वतःच्या २२ प्रतिज्ञा दिल्या. एकाच वेळी व शांततामय मार्गांनी घडून आलेले बौद्ध धर्मांतर जगाच्या इतिहासातील सर्वात मोठे सामूहिक धर्मांतर आहे. असे भन्ते गगनबोधी यांनी धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे औचित्य साधून आपल्या प्रवचनातून बौध्द उपासक उपासिका बालक बालिका यांना संबोधित केले. यानंतर आयोजका कडून भोजनदान व खीरदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बौध्द समाजातील जेष्ठ नागरिक महामाया महिला मंडळ व चिमुकल्यांची मोठया संख्येने उपस्थिती होती. हा धम्मचक्र प्रवर्तन दिन यशस्वी करण्यासाठी भीमनगर, नवी आबादी, अशोका नगर, लूंबिनी नगर, सिद्धार्थ नगर, समता नगर, येथील युवकांनी परिश्रम घेतला होता.

## अंबरनाथच्या आय.टी.आय ला हुतात्मा हिराजी पाटील यांचे नाव

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१२, अंबरनाथ (ठाणे) :** अंबरनाथच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा (आय.टी. आय) नामकरण सोहळा नुकताच संपन्न झाला. या महाविद्यालयाला आता हुतात्मा वीर हिराजी गोमाजी पाटील यांचं नाव देण्यात आलं आहे. या नामकरण सोहळ्याला हुतात्मा वीर हिराजी पाटील यांचे कुटुंबीय आणि इतर राजकीय मान्यवर देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते. अंबरनाथ आय.टी.आय ला अखेर क्रांतिकारकाच नाव मिळालं आहे. शनिवार, दिनांक १२ ऑक्टोबर रोजी अंबरनाथ आय.टी.आय चा नामकरण सोहळा संपन्न झाला. वीर हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील या क्रांतिकारकाच नाव अंबरनाथ आय.टी.आय ला देण्यात आले.

राज्याचे कौशल्य विकास रोजगार मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी अंबरनाथमध्ये आयटीआय निदेशकांच्या कार्यक्रमात अंबरनाथ आयटीआयचं लवकरच नामकरण होणार असल्याचं सांगितलं होत. त्यानुसार स्थानिक आमदार डॉ.बालाजी किणीकर आणि कल्याण लोकसभेचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी एकमताने सुचवलेल्या वीर हुतात्मा हिराजी गोम ाजी पाटील या क्रांतिकारकाचं नाव अंबरनाथ आय.टी.आय ला देण्यात आलं. यावेळी स्थानिक आमदार डॉ बालाजी किणीकर, शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे आणि हिराजी पाटील यांचं कुटुंबीय हजर होते. तसेच अंबरनाथ आयटीआयचे प्राचार्य, आगरी समाज संघटनेचे पदाधिकारी आणि अंबरनाथ आयटीआय मधील निर्देशक देखील उपस्थित होते.